# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/02/2024 (रविवार) सकाळ


---

### घरफोडी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पोलीस स्टेशन सावनेर येथिल अप क्र. ८१/२४ कलम ३८०, ४५७, ४२७ भा द.वी. गुन्ह्यामध्ये आरोपीतांनी एका चार चाकी कारने येऊन सावनेर टाऊन परिसरात SBI बँकचे ATM गॅस कटरने कापून १०,३०,२००/— रुपयाची चोरी केली आहे. सदर गुन्हयाचे तपासात आरोपी यांनी वापरले कार हिचा CCTV कॅमेरे व टोल नाका याचे करून माहिती घेण्यात आली, आरोपीतांनी वापरलेल्या कारचा वेळोवेळी नंबर बदलवून तपासाची दिशा भूल करण्याचा प्रयत्न केला. टोल नका येथे दिनांक २९.०१.२०२४ चे सर्व CCTV कॅमेरे चेक केले असता आरोपीचे वाहण वापरलेला फास्ट टॅग ID मिळून आला ज्यावरून माहिती घेऊन मोबाईल नंबर प्राप्त करण्यात आला व त्यावर संपर्कात असलेल्या आरोपी बाबत माहिती घेण्यात आली तसेच आरोपीचे कारचे येण्याचा व जाण्याचा मार्ग शोधण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपी १. इरफान  इम्रान खान २. मुबारक इम्रान खान दोन्ही रा. उटावड ता. हतीन जी. पलवल राज्य हरियाणा ता. ३. वसिम मुसा खान रा. ओहता ता. पुन्हाना जी. नुह राज्य हरियाणा यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले तसेच गुन्ह्यात वापरलेले वाहन वसीम खान याचे असल्या बाबत माहिती मिळाली आरोपीतांचा शोध घेतला असता आरोपी इरफान खान मिळून आला त्यास गुन्ह्याचे तपास कामी ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन सावनेर येथे आणुन पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब, नागपूर ग्रा. श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि. कॉक्रेटवार, राजेंद्र रेवतकर, प्रमोद भोयर, नापोशि किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, पोस्टे सावनेर येथील सपोनि शरद भस्मे, सफौ गणेश राय, पोहवा अविनाश बहेकर, रवि मेश्राम, पोलीस अंमलदार दाउद मोहम्मद यांनी संयुक्तिकरीत्या पार पाडली.

### उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे पथकाची ठिकठिकाणी जुगार खेळणारे तसेच सट्टापट्टी आकडे लिहणाऱ्यांवर धडक मोहीम

श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे पथकाने दि. ०९/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील मौजा नांदागोमुख येथे लोकांकडून पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळविणारे ईसम १) नामदेव तुळशीराम शेटे रा. धापेवाडा व २) राजु जयराम नेवारे रा. भडांगी ता. कळमेश्वर यांचे धाड टाकुन त्यांचेकडुन एकुण ८५७०/— रू. चा माल जप्त करून वरील दोघांनाही सट्टापट्टीचे आकडे लिहण्यास सांगणारा शफी फारूख रा. धापेवाडा यांचेविरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे कलम १२(अ) म.जु.का. सहकलम १०९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा उबाळी येथे तासपत्त्यावर पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळणारे ईसम १) चंद्रशेखर महादेव चिमुरकर २) सुनिल हरी कंभाले ३) स्वप्नील रामचंद्र खंडाळकर तिन्ही रा. उबाळी यांना पकडुन त्यांचेकडुन एकुण

२३,४८०/— रू. चा माल जप्त करून त्यांचेविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दि. १०/०२/२०२४ रोजी मौजा उपरवाही ता. कळमेश्वर येथे लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळविणारा ईसम आकाश सोमकुवर रा. सोनेगाव यास पकडुन त्याचेकडुन एकुण ८३५०/—रू. चा जप्त करण्यात आला व त्याचा सट्टापट्टीचे आकडे लिहण्यास सांगणारा संजय गुप्ता रा. कळमेश्वर या दोघांविरूध्द कलम १२ (अ) म.जु.का. सहकलम १०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात मपोहवा संगिता कोदे, पोहवा सुरज भोयर, पोशि नितेश पुसाम, पोशि अर्नव भांगे यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर